३५०-A
सर्व प्रत/अभि.
आदेश

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईंट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई

क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ 1504 दिनांक : १८ मे,२००१

परिपत्रक क्र.७०

**विषय** : विशिष्ट कामाचा अनुभव असलेल्या कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार (Collaboration) करणेबाबत.

**संदर्भ** : १) या कार्यालयाचे दि.६ मे,१९९८ चे परिपत्रक क्र.जा.क्र.मजीप्रा/ सस/तांशा-१/३५०/१३६७.
२) या कार्यालयाचे दि.२१/७/२००० चे परिपत्रक क्र.४७

नागरी अथवा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे बाबतीत प्राधिकरणाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत कंत्राटदाराने जर निविदा मिळविण्यासाठी अर्ज केला असेल व तो कंत्राटदार प्राधिकरणाकडे नव्याने नोंदणीकृत झाला असेल (म्हणजेच त्याला स्वत: पाणी पुरवठा योजनेतील विशिष्ठ कामाचा अनुभव नसेल) तरीही त्याने विशिष्ठ कामाचा अनुभव असलेल्या प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार (Collaboration) केलेला असेल तर त्या कंत्राटदारास पूर्वअर्हता प्रमाणपत्र देउन निविदापत्रे देण्यांत यावीत , या संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये देण्यात आलेल्या सूचना संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये मागे घेण्यात आलेल्या असून ठेकेदारांचा वर्ग व विशिष्ठ प्रकारच्या कामाचा अनुभव याच निकषावर ठेकेदाराची पूर्वअर्हता ठरविण्यात यावी अशा सुधारित सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

मध्यंतरीच्या काळात सहकार्य कराराची सवलत चालू ठेवण्यात यावी असे अभिप्राय सर्व क्षेत्रीय कार्यालयांकडून प्राप्त झाल्याने प्रस्तुत प्रकरणाचा पुनर्विचार करुन या अनुषंगाने पूर्वी निर्गमित करण्यात आलेल्या सूचना रद्द करण्यात येवून खालीलप्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) **नागरी पाणी पुरवठा योजना :–**

१) ज्या नागरी पाणी पुरवठा योजनांच्या प्रत्येक उप कामाच्या वेगवेगळ्या निविदा मागविल्या गेल्या असतील अशा प्रकरणी सहकार्य करार करण्यास परवानगी देवू नये. ज्या कंत्राटदारास त्या विशिष्ठ उप कामाचा अनुभव आहे अशाच कंत्राटदारास पूर्वअर्हता देण्यात यावी.

२) ज्या नागरी पाणी पुरवठा योजनेतील दोन किंवा त्यापेक्षा जास्त स्थापत्य उप कामाची एकत्रित एक निविदा मागविली गेली असेल अशा प्रकरणी,

- विशिष्ठ कामाचा अनुभव असलेल्या उप कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार करण्यास परवानगी दयावी.
- निविदांतर्गत असलेल्या कामांपैकी जास्त किंमतीच्या दोन कामाचा अनुभव ज्या कंत्राटदारास आहे अशाच कंत्राटदारास 'मुख्य कंत्राटदार' म्हणून काम करण्यास परवानगी दयावी. असा मुख्य कंत्राटदार निविदांतर्गतच्या इतर कामांसाठी त्या-त्या कामांचा पूर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांबरोबर सहकार्य करार करु शकेल.
- निविदेसाठी पूर्वअर्हता प्राप्त करताना/निविदा सादर करताना मूळ कंत्राटदाराने ज्या सह कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार केला आहे त्याच सह कंत्राटदाराकडून संबंधित उप काम करुन घेणे बंधनकारक राहील व अशा प्रकारचे रितसर नोंदणी केलेले दस्तऐवजावरील हमीपत्र मूळ कंत्राटदाराने निविदा भरताना देणे बंधनकारक राहील.

३) जलशुध्दीकरण केंद्र अथवा मलशुध्दीकरण केंद्र या एकाच कामाची स्वतंत्र निविदा मागविण्यात आली तरी त्यासाठी आवश्यक असल्यास मूळ ठेकेदाराला जलशुध्दीकरण केंद्रातंर्गतच्या यांत्रिकी/ विद्युत कामांसाठी सुयोग्य सह कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार करता येईल.

४) नागरी पाणी पुरवठा योजनांतर्गत विद्युत/यांत्रिकी कामाच्या स्वतंत्र निविदा मागविण्यात याव्यात. या अनुषंगाने यापूर्वीच लागू केलेल्या सविस्तर परिपत्रकातील अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील. (संदर्भ दि.२१/३/९८ चे परिपत्रक क्र.MJP/1098/104/Stores/594 )

५) ज्यावेळी मृदु पोलादी पाईप लाईनच्या कामाची व अशा पाईप लाईनला आतून सिमेंटच्या अस्तरीकरणाच्या कामाची एकत्रित निविदा मागविली जाईल त्यावेळी मूळ कंत्राटदाराने पाईपलाईनचे काम करणे बंधनकारक राहील. तथापि, मूळ कंत्राटदार , सिमेंटचे अस्तरीकरणाचे काम करणाऱ्या सह कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार

**ब)** **ग्रामीण पाणी पुरवठा योजना :-**

१) विशिष्ठ कामाचा अनुभव असलेल्या उप कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार करण्यास परवानगी राहील.

२) निविदांतर्गत असलेल्या कामांपैकी जास्त किंमतीच्या दोन कामाचा अनुभव ज्या कंत्राटदारास आहे अशाच कंत्राटदारास 'मुख्य कंत्राटदार' म्हणून काम करण्यास परवानगी दयावी. असा मुख्य कंत्राटदार निविदांतर्गतच्या इतर कामांसाठी त्या-त्या कामांचा पूर्वानुभव असलेल्या सक्षम कंत्राटदारांबरोबर सहकार्य करार करु शकेल.

३) निविदेसाठी पूर्वअर्हता प्राप्त करताना/निविदा सादर करताना मूळ कंत्राटदाराने ज्या सह कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार केला आहे त्याच सह कंत्राटदाराकडून संबंधित उप काम करुन घेणे बंधनकारक राहील व अशा प्रकारचे रितसर नोंदणी केलेले दस्तऐवजावरील हमीपत्र मूळ कंत्राटदाराने निविदा भरताना देणे बंधनकारक राहील.

वर उल्लेख केल्याप्रमाणे ज्या सह कंत्राटदाराबरोबर सहकार्य करार करुन काम करण्याचे मूळ कंत्राटदाराने मान्य केले आहे त्याच सह कंत्राटदाराकडून काम करुन घेणे मूळ कंत्राटदारास बंधनकारक करावे व अशा या आशयाचे हमीपत्र मूळ कंत्राटदाराकडून घ्यावे.

वरील तरतूदी नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी लागू करीत असतानाच कामाच्या किंमतीनुसार मूळ कंत्राटदाराचा वर्ग, पूर्व अर्हतेसाठी विशिष्ट कामाचा मूळ कंत्राटदारास अथवा सह कंत्राटदारास अनुभव असणे (**Prequalifacation criteria**) याबाबत प्राधिकरणाने या आधी जी परिपत्रके निर्गमित केली आहेत त्यामधील तरतूदी देखील लागू राहतील. तसेच सह कंत्राटदार देखील प्राधिकरणाकडे योग्य वर्गात (संबंधित कामाच्या किंमतीस अनुसरुन) नोंदणीकृत असणे आवश्यक असेल व सहकार्य करार हा रितसर पंजीकृत (Notorised) केलेला असावा.

या अनुषंगाने प्रसंगत: असेही निदर्शनास येत आहे की, सहकार्य करार (Collaboration) व Joint Venture हे दोन वेगवेगळ्या प्रकारचे करारनामे आहेत याबाबत सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना माहिती नाही. त्यामुळे सहकार्य करार (Collaboration) आणि Joint Venture या दोन प्रकारच्या करारनाम्यात असलेला फरकही खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे.

''सहकार्य करारामध्ये कोरी निविदा देतांना ती फक्त मूळ कंत्राटदाराची आर्थिक क्षमता व नोंदणीकृत वर्ग लक्षात घेवूनच देण्यात येते व मूळ कंत्राटदारच कामासाठी संपूर्णपणे जबाबदार असतो.तर Joint Venture मध्ये कोरी निविदा देतांना संबंधित सर्व सहकाऱ्यांची आर्थिक क्षमता एकत्रितपणे विचारात घेण्यात येते व संबंधित सर्व सहकारी कंत्राटदार एकत्रितपणे कामास जबाबदार असतात.''

उपरोक्त सूचना या परिपत्रकाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

(राजेंद्र सगणे) १८/५/०९
**सदस्य सचिव(तांत्रिक)**

प्रत : मा.मंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष मंत्रालय,मुंबई,माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष,मंत्रालय,मुंबई,माहितीसाठी सादर.
मा.राज्यमंत्री,नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष,मंत्रालय,मुंबई,माहितीसाठी सादर.
प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई ,माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव(प्रशासन),म.जी.प्रा.,मुंबई,यांचे माहितीसाठी सस्नेह रवाना.
प्रधान महालेखाकार(लेखा परिक्षा)१, महाराष्ट्र १०१,महर्षी कर्वे रोड, चर्चगेट,यांचे माहितीसाठी.
मुख्य अभियंता,म.जी.प्रा.विभाग(सर्व),यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी,म.जी.प्रा.,नवी मुंबई,यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ(सर्व) यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.बांधकाम विभाग(सर्व)यांचे माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.